# चीनी नववर्ष २०२० : मूषक-वर्ष

*चीनी राशिचक्रात समावेश होतो बारा वर्षांच्या कालचक्राचा आणि त्यातील प्रत्येक वर्षाची सांगड एका विशिष्ट प्राण्याशी घातली गेली आहे. असे मानले जाते की, एखाद्या वर्षात जन्मलेले लोक आणि स्वतः ते वर्ष त्या-त्या प्रतीमात्मक प्राण्याचे गुण प्रतिबिंबित करतात. चंद्र तिथीनुसार या वर्षी, चीनी नववर्ष शनिवारी म्हणजेच २५ जानेवारीला आहे. हा दिवस असे सूचित करतो की, मूषक वर्षाचा [मूषक अर्थात् उंदीर] प्रारंभ झाला आहे, जो चीनी राशिचक्राच्या बारा वर्षांच्या कालचक्रातील पहिला प्राणी आहे.*

*मूषक वर्षात जन्माला आलेल्या लोकांमध्ये जे गुण आढळतात, ते म्हणजे, हे लोक गोष्टींकडे बारकाईने पाहतात, त्यांची विचारसरणी सकारात्मक असते आणि ते परिस्थितींशी समन्वय साधणारे असतात. त्यांचे व्यक्तिमत्व सामाजिक, सदाबहार आणि मनमिळाऊ असते. त्यांच्यावर जेव्हा हलाखीची परिस्थिती येते, तेव्हा त्यांच्यातील धाडसी आणि सकारात्मक स्वभाववैशिष्ट्यांचा उदय होतो. याशिवाय, त्यांना आजुबाजूच्या वातावरणाचे आकलन चटकन होते आणि ते बदलत्या परिस्थितींशी स्वतःला जुळवून घेतात.*

# उंदराची शर्यत

## सिंधू पोर्टर यांच्याद्वारे पुनर्लिखित एक कथा

ही गोष्ट त्या कालखंडाच्याही पूर्वीची आहे, जेव्हा देवी ‘नू वा,’ जी हे निश्चित करते की, संपूर्ण विश्वाची व्यवस्था व त्याची कार्यप्रणाली सुव्यवस्थितपणे सुरू राहावी, ती भूलोकावर उतरली आणि तिने मानवाची रचना केली. तिचे कार्य पूर्ण झाल्यावर ती आपले पती, स्वर्गाधिपतींच्या महालात परतली. पृथ्वीवरील तिच्या पहिल्या यात्रेदरम्यान ‘नू वा’ने पाहिले की, तेजस्वी सूर्य आणि विपुल प्रमाणातील पाऊस येथील मातीला प्रेमाने कुरवाळत आहेत. देवीला हे जग खरोखरच एक चमत्कार असल्याप्रमाणे वाटले.

तथापि, ‘नू वा’ घरी परतलीच होती की, महाराजांनी तिला एक असे कार्य करण्याची विनंती केली, जे अचंबित करणारे होते. देवीला त्वरित पृथ्वीवर परत जाऊन त्या मोठ्या छिद्राची दुरुस्ती करायची होती, जे आकाशाला पडले होते. कसेही करून, ‘नू वा’ला ते छिद्र शक्य तितक्या लवकर नीट करायचे होते.

‘नू वा’ने आपल्या दैवी शक्तींनी छिद्र पुन्हा भरून काढण्यासाठी एक रंगीबेरंगी दगड त्या छिद्रात बसवला. असे करण्यासाठी तिने पृथ्वीवर राहणाऱ्या महाकासवाच्या चार पायांचा उपयोग केला, ज्यांच्या आधाराने आकाशाला वरती धरून ठेवता येऊ शकेल. तसे पाहिले तर, ही युक्ती काही दृष्ट्या प्रभावी आणि व्यावहारिक जरी असली, तरी पृथ्वीच्या संरचनेतील या मोठ्या परिवर्तनामुळे भूकंप झाला, ज्याने संपूर्ण जग हादरून गेले. भूभाग खचले, अतिशय प्रचंड असे महापूर आले. त्यामुळे पृथ्वीवरील समुद्रांमधील जलस्तर खूपच वाढला. ज्या नश्वर जगाची निर्मिती ‘नू वा’ने इतक्या प्रेमाने केली होती, त्यावर अचानक एक भयानक संकट ओढवले होते.

स्वर्गाधिपतींनी जलदेवाला महापूर नियंत्रित करण्याचा आदेश दिला, जेणेकरून मानवजातीला नष्ट होण्यापासून वाचवता यावे. खूप मेहनत केल्यानंतर, मोठ्या मुश्कीलीने जलदेव पाण्याला आटोक्यात आणण्यात यशस्वी झाले. तरीही काही ठिकाणी, अजूनही पूर येतच राहिला होता. मानवजात पूर्णपणे थकली होती, आता त्यांच्यात उसळत्या लाटांना थोपवून धरण्याचे त्राण उरले नव्हते.

या पृथ्वीवर राहून तिचे रक्षण आणि तिची देखभाल करणारे असंख्य प्राणी, क्षणार्धात वीज चमकल्याप्रमाणे एका दृष्टान्तात जलदेवाला दिसले. त्या सर्वांनी स्वतःच्या सुरक्षेसाठी पळून जाऊन पर्वतांवरील उंच जागांवर आश्रय घेतला होता. मग जलदेव त्यांना शोधणार तरी कसे? ते आपल्या

कामकाजात अतिशय व्यस्त असल्याने स्वतः हे कार्य करण्यास जाऊ शकत नव्हते, म्हणून त्यांनी आपला एक मदतनीस, ‘यू’ला त्या सर्व प्राण्यांचा शोध घेण्यास पाठवले तसेच मदत करण्यासाठी सर्व प्राण्यांना विनंती करण्यासही सांगितले.

पृथ्वीचा बचाव करण्यासाठी या असंख्य प्राण्यांना एकत्रित करण्याची अतिशय कठीण कामगिरी ‘यू’वर सोपवली गेली होती. त्याने प्रार्थना केली, “पृथ्वीवरील सर्व प्राणी सुरक्षिततेसाठी उंच-उंच पर्वतमाथ्यांवर जाऊन लपले आहेत! मी त्यांना इथे कसा आणू?” इतके बोलून तो थांबला. आता पुढे काय करावे हे त्याला कळेना.

त्याच क्षणी ‘यू’ने खाली पाहिले आणि त्याची नजर जमिनीवर असलेल्या एका उंदरावर [उंदीर अर्थात् मूषक] पडली; उंदीर एकटाच होता. घाबरून इकडेतिकडे पळत असताना तो गोंधळून गेला व तिथेच थांबला. तेव्हा, ‘यू’ला दिसलेला हा छोटासा एकच जीव का असेना, पण त्या छोट्याशा जीवाला पाहून ‘यू’चा जीव भांड्यात पडला.

आणि त्याचबरोबर ‘यू’ हे पाहून आश्चर्यचकितदेखील झाला की, अशा या प्रलयाच्या क्षणी त्याला हा किळसवाणा-मळकट उंदीर कसा काय भेटला असावा. तेव्हा त्याच्या लक्षात आले की, उंदीर तिथेच जिवंत राहतात, जिथे माणसे असतात. जलदेवाला साहाय्य करण्यासाठी त्याला केवळ एकच प्राणी सापडला — हा उंदीर! म्हणून ‘यू’ने हात पुढे करून त्या उंदराला पकडले आणि त्याला आपल्या दुमडलेल्या शालीवर ठेवले.

पुराचे पाणी मिनिटामिनिटाला वाढतच होते. हातातल्या त्या कुडकुडणाऱ्या जीवाला जलदेवाच्या इच्छेविषयी सांगितल्यावर ‘यू’ चिंतामुक्त झाला; त्या छोट्याशा जीवाप्रति असलेली त्याच्या मनातील कृतज्ञतेची भावना हजारो पटींनी वाढली. आणि इकडे, उंदराला ही गोष्ट त्वरित समजली की, ज्या व्यक्तीने त्याला उचलून घेतले आहे, त्या व्यक्तीच्या मनातील हेतू काही वाईट नव्हता, जसे उंदराला आधी वाटले होते. आणि म्हणून, उंदीर ‘यू’ला मदत करण्यासाठी आणि या जगाच्या रक्षणार्थ इतर प्राण्यांना गोळा करण्यासाठी अगदी सहजपणे तयार झाला.

आपल्या सहचरांना आपल्यासोबत घेत, तो चतुर उंदीर झाडांवर आणि पर्वताच्या बाजूच्या भागांत लपून बसलेल्या खूप साऱ्या प्राण्यांना बाहेर घेऊन आला. त्याने प्राण्यांचा राजा असलेल्या वाघाचेदेखील मन वळवले की, त्याने प्राण्यांच्या सेनेला पर्वतांवरील त्या उंच-उंच स्थानांवरून खाली उतरण्यासाठी मार्गदर्शन करावे; इतकी उंच स्थाने की, जिथून खाली पाहिल्यावर एखाद्याला चक्कर

यावी. छोटे-मोठे सर्वच प्राणी पळू लागले; उरल्यासुरल्या कोरड्या जमिनीवर उभे राहून ते मनुष्यांसह वाढत्या पाण्याला थोपवायचा प्रयत्न करू लागले.

अशा प्रकारे माणसांनी आणि प्राण्यांनी मिळून शेवटी एकदाचा पूर थोपवला. जलदेवाच्या निर्देशनाखाली उंदराच्या निर्भय स्वभावामुळे जे पराक्रमी जीव एकत्र आले होते, ते सर्व मिळून पृथ्वीचे रक्षण करू शकले. संघटित होऊन पृथ्वीच्या सौंदर्याचे आणि विविधतेचे संरक्षण करण्यात ते यशस्वी झाले.

ही विलक्षण कामगिरी सर्वांच्या स्मृतीत राहावी यासाठी स्वर्गाधिपतींनी एक घोषणा केली, जी तिथे उपस्थित असलेल्या सगळ्यांनीच ऐकली. ज्या प्राण्यांनी पृथ्वीला वाचवण्यासाठी प्रयत्न केले होते, त्यांना स्वर्गाधिपतींद्वारे असा सन्मान प्रदान करण्यात येईल, की जो अनंत काळापर्यंत स्मरणात ठेवला जाईल. स्वर्गाधिपतींनी जाहीरपणे असे स्पष्ट केले की, त्यांनी दूर स्थानी एक चमचमती पूजा-वेदी तयार केली आहे आणि ती वेदी पावन वस्तूंनी सजलेली आहे, जेणेकरून त्या परम दिव्य शक्तिस्त्रोताची अभिस्वीकृती करून त्याच्याप्रति कृतज्ञता व्यक्त करता येईल, ज्याने जगाच्या भवितव्याला सुरक्षित केले आहे.

खणखणीत आवाजात स्वर्गाधिपतींनी घोषणा केली, "शर्यतीमध्ये जे बारा प्राणी या पावन पूजा-वेदीपर्यंत पोहोचतील, ते चीनी राशिचक्राच्या बारा देवता बनतील. आजपासून पुढे दरवर्षी त्यांना हा मान दिला जाईल!"

प्राण्यांची शर्यत सुरू होण्याच्या आदल्या रात्री, चतुर उंदीर विचार करू लागला की, त्या वेदीपर्यंत कसे पोहोचता येईल. तो धावला — प्रथम एका दिशेला, मग दुसऱ्या दिशेला; कोणता रस्ता चांगला असेल याचाही अंदाज त्याने घेतला. त्या पवित्र वेदीपर्यंत तो सर्वांच्या आधी कसा काय पोहोचणार होता?

त्याच वेळी उंदराला लपण्यासाठी एक सर्वात चांगली जागा सुचली — बैलाच्या बलशाली शिंगांमधील सुरक्षित जागी तो गुपचुप जाऊन बसला. शर्यतीदरम्यान उंदीर दिसणारही नाही, आणि त्याचबरोबर, बैल जसजसा धावेल, तसतसा उंदीरही शर्यतीचे अंतर पार करत पुढेपुढे जात राहील. उंदराला एक गोष्ट तर निश्चितच माहित होती : सर्वात बलवान, सर्वात दृढनिश्चयी असल्यामुळे बैल इतर सर्वांच्या पुढे निघून जाईल आणि स्वर्गाधिपतींनी निश्चित केलेल्या वेदीपर्यंत पोहोचेल.

उंदराने विचार केला : "राशिचक्राची प्रथम देवता मी जरी बनलो, तरीही त्याच्या वक्राकार शिंगात बसून मी फिरलो आहे याबद्दल बैलाला कधीच वाईट वाटणार नाही, हे मी अगदी खात्रीने जाणून आहे. मला

जर बक्षीस मिळाले, तर बैल स्वतःच्या निष्ठावान आणि अविचल स्वभावामुळे, त्याला मान्यता देईल." उंदराला हे पक्के ठाऊक होते की, शर्यतीचा निर्णय काहीही लागला, तरी त्याचा मित्र स्वर्गाधिपतींच्या आज्ञेचे पालन करेल.

सकाळ झाली; खूपच सुंदर आणि शांत सकाळ होती ती. त्या दिवशी उगवत्या सूर्याची किरणे अतिशय असाधारण तेजस्वीपणे धरतीला स्पर्श करत होती. खवळलेले पाणी शांत झाले होते आणि अलीकडच्या काही दिवसात सुरू असलेल्या भयानक घटनांपासून सुटका झाल्यामुळे जमीन चमकत होती. असंख्य पक्षी मधुर सुरांमध्ये गुणगुणू लागले; त्या प्राण्यांच्या खुरांचे, पंखांचे आणि नखे असलेल्या पंजांचे आवाज ऐकू येऊ लागले, जे आपल्या मनात बाळगलेले लक्ष्य साध्य करण्यासाठी अगदी तयार झाले होते. शर्यत सुरू होण्याआधी, क्षणभर सगळीकडे शांतता पसरली.

उंदराला जसे अपेक्षित होते, अगदी तसेच झाले, त्या सकाळी दृढनिश्चयी आणि एकाग्रचित्त बैल लवकरच पुढे निघून गेला आणि संपूर्ण शर्यतीदरम्यान कोणीही त्याच्या पुढे जाऊ शकले नाही.

आणि मग उंदराने असे काही केले की, ज्याचा कुणी विचारदेखील केला नसेल. बैल चमचमत्या वेदीपर्यंत पोहोचणारच होता की, उंदराने पाय दुमडून पवित्रा घेतला आणि त्याने झपाट्याने, बैलाच्या शिंगांमधील आपल्या आश्रयस्थळातून बाहेर निघून पुढे उडी मारली. जोरदार विजयघोषणेच्या स्वरासह तो वेदीवर सजलेल्या गुलाबी पिओनीझ् फुलांच्या फुलदाणीच्या बाजूला उतरला.

तिथे एकत्रित झालेल्या सर्वांचे लक्ष बैलासाठी जोरजोरात टाळ्या वाजवण्याकडे होते, आणि अचानक सर्वजण थक्क झाले की, उंदराला हे दिमाखदार यश कसे बरे मिळाले असावे! संपूर्ण मैदानात कुजबुजण्याचा आवाज पसरला, "उंदराने असे करणे योग्य होते का की, निम्म्याहूनही जास्त अंतर दुसऱ्याच्या शिंगामागे बसून त्याने शर्यत जिंकावी?" अगदी खरे सांगायचे झाल्यास कोणालाही असे वाटत नव्हते की, उंदीर बक्षीसास पात्र आहे.

उंदरामध्ये अनेक गुण असूनदेखील, सर्वजण हाच विचार करत होते की ज्यांनी शर्यतीत भाग घेतला त्या अन्य जीवांपेक्षा उंदीर हा कोणत्या ना कोणत्या प्रकारे कमी दर्जाचाच होता. त्याच्या आकारामुळे लोकांनी मनातल्या मनात त्याला अयोग्य ठरवले होते का? की मग असे होते की, त्याची चतुराई आणि त्याच्या धूर्तपणामुळे त्याचा नावलौकिक चांगला नव्हता? खरे तर, स्वतःच्या या स्वभाववैशिष्ट्यांमुळेच उंदीर शतकानुशतके टिकून राहिला होता.

सरतेशेवटी, ही गोष्ट कोणीही नाकारू शकले नाही की, उंदराने स्वर्गातील पूजा-वेदीपर्यंत सर्वात आधी पोहोचण्याची कल्पक युक्ती शोधून काढली होती. हे मान्य करण्यात आले की, तो उंदीरच होता ज्याने स्वर्गाधिपतींच्या तोंडातून बाहेर पडलेल्या आदेशाचे पालन अगदी तंतोतंत केले होते. अनंत काळापर्यंत चीनी राशिचक्राचा पहिला प्राणी असल्याचा किताब उंदराला देण्यात आला. चाणाक्ष तसेच अत्यंत बुद्धिवान आणि परिस्थितींशी जुळवून घेणाऱ्या उंदराने हे दाखवून दिले की, युक्तीने स्वतःचे काम करून घेणे हा त्याचा जन्मजात गुण आहे.

याशिवाय, त्याने सद्गुणांचे प्रदर्शन अशा प्रकारे केले की, स्वर्गाधिपतींनी त्याच्या चुकीसाठी त्याला माफ केले. स्वर्गाच्या न्यायाचा तराजू उंदराच्या बाजूने झुकला आणि त्या दिवसापासून उंदीर एक लाडका विजेता बनला.

निकाल जाहीर झाल्यावर, स्वर्गाधिपतींनी सर्व प्राण्यांचा सन्मान केला. त्यांनी त्या दिवशी केलेली घोषणा कधीच बदलणार नव्हती. उंदराला सन्मानपूर्वक तथाकथित स्थान बहाल केले गेले आणि त्याला चीनी राशिचक्राच्या क्रमात पहिले स्थान दिले गेले. छोटा आकार आणि धूर्तपणा अवलंबल्यावरही उंदीर म्हणजेच मूषक धरतीवरील सर्व जीवांपेक्षा श्रेष्ठ ठरला.

भलेही, महाराजांची आज्ञा पूर्ण झाली असेल, प्राण्यांमधील शर्यतीचा निकाल लागला असेल, पण तो कोण होता ज्याच्या करामतींनी सर्वांचे लक्ष आकर्षित केले होते? तो कोण होता ज्याची कथा अजरामर झाली? होय, तुमचा अंदाज खरा आहे : उंदीर, मूषक! आजदेखील मूषकचे यश प्रत्येकाच्या स्मरणात राहिले आहे.

ज्या लोकांचा जन्म मूषक-वर्षात झाला आहे, त्यांनी स्वतःला भाग्यवान समजायला हवे आणि खुश व्हायला हवे की, त्यांना मूषकाचे चातुर्य, सकारात्मकता, लवचिकता, परिस्थितीशी जुळवून घेण्याची योग्यता आणि सतर्कता उपजतच लाभलेली आहे.

© २०१९ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.